Head Office : Level 4, Muttha Towers, Loop Road,
Near Don Bosco Church, Yerawada, Pune 411006
Tel.: 020 4120 0600, 4128 0011, 4128 0012
Website : www.bjsindia.org E mail : info@bjsindia.org
Facebook : www.facebook.com/BJSIndia

BJS
Bharatiya Jain Sanghatana

**"श्रमदान करून दुष्काळमुक्त होणा-या २००० गावांना कठीण काम मशीनद्वारे करुन देण्याचा उपक्रम"**

मा. संपादक,

भारतीय जैन संघटना (बीजेएस) गेली ३२ वर्षे नैसर्गिक आपत्ती क्षेत्रात देशभर कार्यरत आहे. २०१३मध्ये फक्त बीड जिल्ह्यात ११७ तलावातील २० लाख क्युबिक मीटर गाळ काढून तो ५००० एकर जमिनीवर पसरविण्यात आला होता. २०१५-१६ मध्ये सुद्धा बीड, लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यात अशी कामे करण्यात आली आहेत. महाराष्ट्रातील आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या ५५०मुला-मुलींचे शैक्षणिक पुनर्वसन पुणे येथे गेल्या दोन वर्षांपासून करण्यात येत आहे. महाराष्ट्रात दुष्काळाची तीव्रता गेल्या पाच वर्षात सातत्याने वाढतच चाललेली आहे.

महाराष्ट्रामध्ये गेल्या वर्षापासून पानी फौंडेशनने वाटरकप स्पर्धा सुरु केली आहे. या स्पर्धेचे वैशिष्ट म्हणजे गावक-यांनी स्वतः या कार्यासाठी एकत्र यायचे, पाच लोकांना प्रशिक्षणाला पाठवावयाचे, आपल्या गावचा वाटर शेड मॅनेजमेंट प्लॅन आपणच तयार करायचा व श्रमदानाने काम करून स्वावलंबी व्हायचे. महात्मा गांधींच्या स्वावलंबनाला साजेसे स्वातंत्र्य काळानंतरचे हे सर्वात मोठे काम आहे असे बीजेएसचे मत आहे. गेल्या वर्षी ही स्पर्धा तीन तालुक्यामधील सर्व गावांमध्ये घेण्यात आली होती. या वर्षी या स्पर्धेमध्ये महाराष्ट्राच्या १३ जिल्ह्यातील ३० तालुक्यांची निवड करण्यात आली आहे व दोन हजार पेक्षा जास्त गावांनी या स्पर्धेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रात एकाच वेळी दोन हजार गावांनी श्रमदानाने स्वावलंबी होण्याचा प्रयत्न करणे म्हणजे एक परिवर्तनाची नांदी होय.

या दोन हजार गावातील लोक त्यांच्या त्यांच्या गावामध्ये भरपूर श्रमदान करणार आहेत. तरी सुद्धा श्रमदानानंतरही काही कठीण कामं  गावक-यांना श्रमदानाने करता येणे शक्य नाही. कारण प्रत्येक गावात माथ्यापासून पायथ्यापर्यंत काम करावे लागते. तसेच विशिष्ट काम श्रमदानाने केल्यानंतर खडकात करावे लागणारे काम श्रमदानाने होऊ शकत नाही असे बीजेएसचा अनुभव आहे.

बीजेएसचे संस्थापक श्री. शांतीलाल मुथ्था यांनी राज्य पातळीवरील कार्यकर्त्यांची बैठक घेऊन "श्रमदान करून दुष्काळमुक्त होणा-या २००० गावांना कठीण काम मशीनद्वारे करुन देण्याचा उपक्रम" हाती घेण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. राष्ट्रीय अध्यक्ष श्री. प्रफुल्ल पारख यांच्या नेतृत्वाखालील या सर्व जिल्ह्यांमधील कार्यसमित्या व नियुक्त केलेल्या ५० तालुका सुपरवायझरकडून हे काम ४०० पोकलेन किंवा १२०० जेसीबीच्या सहाय्याने १ महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

दोन महिन्यात एकाच वेळी महाराष्ट्र राज्यातील २००० गावांमध्ये इतक्या मोठ्याप्रमाणावरच्या कार्याचे नियोजन करून ते यशस्वी करणे हे एक मोठे आव्हान आहे. बीजेएसचा गेल्या ३२ वर्षांचा अनुभव पाहता महाराष्ट्रातील संपूर्ण जनतेच्या सहकार्याने व आशीर्वादाने हे नक्कीच पूर्ण करू शकू असा आम्हाला विश्वास आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क : सुहिता - ९८२३३३९११६ Email :sshendye@bjsindia.org
Website :www.bjsindia.org

आपला स्नेहांकित,
शांतीलाल मुथ्था
संस्थापक, बीजेएस